


जयराजः जीवनाची भरती-ओहोटी

चित्रपट म्हटलं की डोळ्यासमोर विरंगुळ्याचे एक साधन असंच चित्र उभं राहतं. परंतु या विरंगुळ्यापुढेही चित्रपटाचा व्यासंग आहे, छंद आहे आणि विषय आहे हे फार कमी लोकांना ठाऊक आहे. अशीच एक व्यक्ती म्हणजे शशिकांत किणीकर. पुण्यात स्थायिक झालेल्या किणीकरांजवळ पार अगदी मूकपट काळापासून ते १९८०पर्यंत सिनेमांची पुस्तिका (बुकलेट), जुने आणि दुर्मिळ फोटो, महत्त्वाच्या व्हिडीयो तसेच ऑडियो कॅसेट, एलपीजी तसेच चित्रपट आणि संगीतक्षेत्रावर आधारित महत्त्वाची पुस्तके यांची आगळी वेगळी जमा आहे. त्यांनी आतापर्यंत लिहिलेल्या छंदपर अभ्यासपूर्ण लेखात मराठी चित्रपट सूची (१९३२-८९) नंतर 'दास्तान-ए-नौशाद' हा जीवनग्रंथ तसेच मधुबालाची जीवनकहाणी ही गाजलेली पुस्तकं होय.

भारतीय चित्रपट इतिहासाच्या मूकपटापासूनचा साक्षीदार असलेल्या जयराज या ज्येष्ठ अभिनेत्यांवर आधारित 'जयराजः जीवनाची भरती-ओहोटी' हे जीवनकहाणी पुस्तक शशीकांत किणीकर घेऊन आले आहेत. कै. सौ. सावित्री जयराज यांना समर्पण करून पुस्तकाला अशोककुमार यांच्या प्रस्तावनेने सुरुवात होते. त्यानंतर जयराज आपल्या मनोगतामध्ये, ''मी महाराष्ट्राचा आजन्म ऋणी आहे त्याची अंशतः फेड मी माझे जीवनचरित्र तेलगू या मातृभाषेत न काढता मराठीत काढून देत आहे.'' तसेच ''मला योगायोगाने चित्रपटसृष्टीचा रस्ता सापडला. कधी ठेचकाळत तर कधी स्वतःला सावरत या रस्त्यावरील भ्रमंती चालू असल्याचे'' सांगतात. तर वयोमानामुळे या सात दशकांतील आठवणीत काही नमूद करायचे राहून गेल्यास ते क्षमा याचना करून या पुस्तकासाठी अडीच वर्ष वेचणाऱ्या किणीकरांचे अभिनंदन करतात. लेखक मनोगतामध्ये पुस्तकाचा जन्म तसेच जयराज यांनीच सुचवलेल्या पुस्तकाच्या नावाचा उल्लेख करतात.

अनुक्रमणिका 'हैदराबाद', 'मुंबईत', 'मूक नायक', 'पुढचं पाऊल', 'देवकी बाबूंच्या सहवासात', 'रायफल गर्ल', 'बॉम्बे टॉकीजमधील दिवस', 'प्रकाश आणि रणजीत पिक्चर्समध्ये', 'विवाह', 'नई कहाणी आणि पन्ना दिग्दर्शन क्षेत्रात', 'जीवनातले चढउतार', 'सामाजिक कार्य', 'जीवनाचं तत्त्वज्ञान' या सुटसुटीत आणि सेल्फ एक्सप्लेनेटरी शीर्षकाद्वारे पुढे पुढे सरकते. पुस्तकाचा शेवट चित्रसूचीद्वारे होतो. यात लेखक जयराज त्यांच्या चित्रपटांचे नाव (मूकपट-बोलपट), साल, निर्मानी संस्था, दिग्दर्शक, इतर प्रमुख भूमिका या वर्गवारीनुसार विशद करतात. परंतु सालानंतर पुढील काळात हिंदी चित्रपटातील नगण्य भूमिकांचे तपशील उपलब्ध नसल्याची नोंद देतात. ती मात्र पटत नाही.



लेखकांजवळ १९१३ पासूनच्या चित्रपटसृष्टीतील तपशील उपलब्ध असताना त्यांना १९९१ सालचा 'नगण्य भूमिकांचा' तपशील मिळू नये हे पटत नाही. पुढे चरित्र अभिनेता म्हणून मराठी, गुजराती, पंजाबी (फक्त नावं आहेत) आणि भोजपुरी (फक्त नाव) चित्रपटांचा तपशील आहे. नंतर इंग्रजी, रशियन हे विदेशी चित्रपट, इंग्रजी-हिंदी भाषेतील लहान पडद्यावरील सूचीदेखील आहे. पुढे दिग्दर्शक आणि निर्माता-दिगदर्शक जयराज यांच्या चित्रपटाचीदेखील सूची आहे.

'चित्रमय जयराज' हे सदर मात्र अगदी चुकीच्या जागी (हैदराबाद या सदराच्या पान नं. ४ मागे १० पानं 'चित्रमय जयराज'नंतर पान नं. ५ सुरू होते) विसावलं आहे. या दुर्मिळ फोटोत जयराज-श्रीमती जयराज, मूकपटातील नायक, बोलपटातील नायिका, अनेकविध भूमिकात, अहिंदी चित्रपटात पुढच्या फोटोत मित्रमंडळींच्या समवेत जयराज आहेत. नंतर मानसन्मान घेतानाचे पी. जयराज यांचे फोटो आहेत. दिग्दर्शक-अभिनेता जयराज या सदरात *माला, प्रतिमा, सागर, मोहर* या चित्रपटाच्या सेटवरील फोटो आहेत.

'जयराजः जीवनाची भरती आहोटी' या पुस्तकाचे मुखपृष्ठ डावीकडे तरुण जयराज तर उजवीकडे वृद्ध जयराज यांचे सूचक छायाचित्र पुस्तकाचा गाभा विशद करते. तर मुखपृष्ठावर नऊ वेगवेगळ्या मुद्रेतील जयराज यांचे भूमिका दर्शन मनभावन ठरते. परंतु अशोककुमार यांची प्रस्तावना, जयराज यांच्या मनोगतामध्ये मीरा प्रकाशनाच्या प्रतिभा भोईटे यांनी लिहिलेलं 'भारतीय चित्रपटसृष्टीचा आलेख' हे पान मात्र खटकते. आणि यात प्रकाशिका प्रस्तावक, मनोगतक आणि लेखकाच्या पुढे जाऊन काही मांडण्याचा निरर्थक प्रयत्न करताना दिसून येते. आत्मचरित्राऐवजी जीवनचरित्र सांगणारे जयराज, जीवनचरित्र नमूद करणारे किणीकर यापलीकडे सगळं थिटं वाटून येतं.

□ हर्षदा वेदपाठक